




सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on








E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - ४ थे | अंक - १७५ वा | अमरावती (महाराष्ट्र) | सोमवार दि. १७ ऑगस्ट २०२६ | संपादक - डॉ. शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -४


# बिहारच्या लखीसरायमध्ये चेंगराचेंगरी, ७ महिला ठार

## मंदिरात जलाभिषेकासाठी जमले होते हजारो भाविक, करंट पसरल्याची अफवा पसरली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७लखीसराय-** बिहारमधील लखीसराय येथील प्रसिद्ध अशोकधाम मंदिरात श्रावण सोमवारी दर्शनासाठी आलेल्या भाविकांसोबत दुर्दैवी घटन घडली आहे. मंदिरात जलाभिषेकासाठी जमलेल्या सुमारे ५० हजार भाविकांच्या गर्दीत अचानक विजेची तार तुटून पडल्याने चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेत ७ भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर १२ पेक्षा जास्त भाविक गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर लखीसराय सदर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आज सकाळी साडेसहा वाजता ही दुर्घटना घडली.

जलाभिषेकासाठी रांगेत उभे असलेल्या गर्दीवर विजेची तार पडल्याने घबराट पसरली आणि चेंगराचेंगरी झाली. मंदिरात भाविकांची प्रचंड आणि अनपेक्षित गर्दी जमली होती. सकाळी साडेसहा ते पावणेसातच्या सुमारास एकाच वेळी दोन गाड्या (ट्रेन) आल्याने गर्दीत आणखी भर पडली. आम्ही गर्दीचा अंदाज घेऊन




आधीच योग्य ती व्यवस्था केली होती. मात्र, गर्दीच्या अति प्रचंड दाबामुळे एका बाजूचे बॅरिकेडिंग (संरक्षक कठडे) तुटले आणि लोक एकमेकांवर पडू लागले. ही माहिती मिळताच आम्ही तातडीने १० ते १५ जणांना रुग्णालयात हलवले, अशी माहिती जिल्हाधिकारी शैलेंद्र कुमार यांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, ही दुर्घटना झाली त्यावेळी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. श्रावण सोमवार असल्याने हजारो भाविक जलाभिषेकासाठी रांगेत उभे होते. त्याच वेळी अचानक विजेची तार पडल्यामुळे लोकांमध्ये भीती पसरली. काही जण घाबरून धावू लागले, त्यामुळे चेंगराचेंगरी झाली. या गर्दीत अनेक महिला दबल्या गेल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस, प्रशासकीय अधिकारी आणि वैद्यकीय पथके तातडीने घटनास्थळी पोहोचली. जखमींना तात्काळ लखीसराय येथील सदर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे. सध्या मदत आणि बचाव कार्य वेगाने सुरू असून प्रशासन परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करत आहे.

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूनीही व्यक्त केला शोक

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूनीही लखीसराय घटनेवर शोक व्यक्त केला आहे. त्या म्हणाल्या- बिहारमधील लखीसराय जिल्ह्यात चेंगराचेंगरीत भाविकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. मी शोकाकुल कुटुंबांप्रती माझ्या संवेदना व्यक्त करते. जखमींच्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी मी प्रार्थना करते.

# उज्जैनच्या नागचंद्रेश्वर मंदिरात चेंगराचेंगरी

## अनेक भक्त गंभीर जखमी, गर्दी नियंत्रणाबाहेर गेल्याने झाली चेंगराचेंगरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ उज्जैन**
मध्य प्रदेशातील उज्जैनमधील महाकालेश्वर मंदिराच्या परिसरातील नागचंद्रेश्वर मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी झाली होती. नागपंचमीनिमित्त भाविकांनी दर्शनांसाठी मोठी गर्दी केली होती. यामुळे नागचंद्रेश्वर मंदिर,हरसिद्धी मंदिर आणि बडे गणेश मंदिर परिसरात चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली होती.

मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर भाविकांची प्रचंड गर्दी झाल्यामुळे परिस्थिती हाताबाहेर गेली. अनेकांची मोठी धक्काबुक्की झाली. या गोंधळाच्या आणि चेंगराचेंगरीसारख्या परिस्थितीत, चिरडले गेल्यामुळे तीन जण गंभीर जखमी झालेत. चेंगराचेंगरीची घटना घडल्यानंतर स्थानिक प्रशासन आणि पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी संपूर्ण परिस्थिती नियंत्रणात आणली.सर्व जखमींना तातडीने प्रथमोपचार देण्यात आले आणि




त्यानंतर पुढील उपचारांसाठी जवळच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. सणासुदीच्या काळात सुरक्षा आणि गर्दीच्या नियोजनाबाबत प्रशासनाकडून आता विशेष खबरदारी घेण्यात येत आहे.भगवान नागचंद्रेश्वर यांचे पवित्र स्थान मध्य प्रदेशातील उज्जैन येथील प्रसिद्ध महाकालेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर परिसराच्या तिसऱ्या मजल्यावर स्थित आहे. या मंदिराचे सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे या मंदिराचे दरवाजे वर्षातून केवळ एकदाच उघडले जातात. नागपंचमीच्या दिवशी पूर्ण २४ तासांसाठी मंदिराचे दरवाजे उघडले जातात. त्यावेळी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होते. या दिवसाव्यतिरिक्त, उर्वरित वर्षभर हे मंदिर भाविकांसाठी बंद असते.

**दुर्मिळ मूर्ती** -मंदिराच्या गर्भगृहात विराजमान असलेली ही ११ व्या शतकातील मूर्ती म्हणजे कला आणि श्रद्धा यांचा एक भव्य संगम आहे. येथे, देवाधिदेव भगवान महादेव आणि माता पार्वती हे दहा ते अकरा फणे असलेल्या एका विशाल शेषनागाच्या छायेखाली विराजमान आहेत. या मनोहारी रूपात त्यांच्यासोबतच, सर्वप्रथम पूजले जाणारे दैवत भगवान गणेशही पाहायला मिळतात. भगवान शिवाचे असे अद्वितीय रूप जगात अन्यत्र कोठेही आढळत नाही, अशी मान्यता आहे.

**वर्षातून एकदा उघडते नागचंद्रेश्वर मंदिर** -श्रावणातील तिसऱ्या सोमवारी भगवान महाकाल आणि नागचंद्रेश्वर मंदिराच्या विशेष दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक उज्जैनमध्ये पोहोचले. यामुळे मंदिर परिसर आणि आसपासच्या मार्गांवर प्रचंड गर्दी झाली. मंदिरात दुपारपर्यंत सुमारे ५.५० लाख भाविकांनी दर्शन घेतले.भगवान नागचंद्रेश्वराचे मंदिर महाकाल मंदिराच्या तिसऱ्या मजल्यावर आहे. नागपंचमी वगळता वर्षभर येथे भाविकांसाठी दरवाजे बंद असतात. याच कारणामुळे नागपंचमीला होणाऱ्या दर्शनासाठी देशाच्या विविध भागांतून भाविक उज्जैनला येतात. यावेळी नागपंचमी आणि श्रावणातील तिसरा सोमवार एकाच दिवशी आल्याने गर्दी वाढली.

# केंद्रीय मंत्रिमंडळाचा लवकरच विस्तार

## राष्ट्रवादीच्या नेत्यांना मिळणार मंत्रिपद, रामदास आठवले यांचे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ नागपूर-** केंद्रीय मंत्रिमंडळाचा लवकरच विस्तार होणार असल्याचं विधान केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केलंय. ते आज नागपुरात एका कार्यक्रमात बोलत होते. महाराष्ट्रातील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांचा मंत्रिपदासाठी समावेश असेल. शरद पवार यांनी एनडीए ) मध्ये सामील व्हावे. जर त्यांनी तसे केले नाही तर त्यांच्या पक्षातील आठ खासदारांनी या एनडीएमध्ये सामील व्हावे, असा सल्लाही आठवले यांनी यावेळी दिला. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज नागपुरात घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं की, काँग्रेस पक्षाने त्यांचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना कधीही मुख्यमंत्री केले नाही. कदाचित, ते अनुसूचित जातीचे असल्यानेच काँग्रेसने त्यांना कधी मुख्यमंत्री केले




नसावं. असा टोला त्यांनी काँग्रेसला लगावला. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराबाबत बोलताना आठवले म्हणाले की, हा विस्तार लवकरच होईल. यासाठी अनेक नावांचा विचार केला जाऊ शकतो. यात काही मंत्री भाजपचे, तर काही राष्ट्रवादी काँग्रेसचे असतील. आठवले यांनी सांगितले की, शरद पवार यांचा पक्ष त्यांच्यासोबत सामील होईल की नाही याबद्दल कोणतीही निश्चित माहिती नसली तरी, शरद पवारांनी एनडीए मध्ये सामील व्हायला हवे. त्यांनी म्हटले, जर जॉर्ज फर्नांडिस सामील होऊ शकत होते, तर तुम्ही का नाही?दरम्यान भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा आज (१७ ऑगस्ट) करण्यात आली. यात वसुंधरा राजे, राम माधव आणि स्मृती इराणी यांसारख्या प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. संघटनेत अनेक माजी आणि विद्यमान नेत्यांवर विविध जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत.

# जुलै-ऑगस्टचा रु.३००० हप्ता मिळणार नाही




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई** लाडकी बहीण योजनेच्या हप्त्याची वाट पाहणाऱ्या महिलांसाठी महत्त्वाची बातमी अपडेट समोर आली आहे. राज्यातील पात्र लाभार्थी महिलांसाठी सरकारकडून ३१९ कोटी रूपयांचा निधी वर्ग केला आहे. मिळालेल्या माहितीनुसा, २ दिवसांत लाडक्या बहिणींच्या खात्यावर जुलै महिन्याचा हप्ता जमा होण्याची प्रक्रिया सुरू होईल. टप्प्याटप्प्याने लाभार्थी महिलांच्या खात्यात हप्ता जमा होणार आहे. पण राज्यातील तब्बल ८० लाख महिलांना या महिन्याचा हप्ता मिळणार नाही. मागील दोन महिन्यापूर्वी झालेल्या ईकेवायसी प्रक्रियेनंतर ८० लाखांच्या आसपास महिलांचा लाभ बंद झाला आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्याचा हप्ता कधी जमा होणार? याकडे राज्यातल्या लाखो महिलांचं लक्ष लागलं आहे. दरम्यान ई-केवायसी प्रोसेसनंतर अपात्र ठरलेल्या महिलांचा योजनेतला लाभ बंद करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे १ कोटी ६६ लाख पात्र महिलांच्या खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मिळून ३००० रुपये जमा होण्याची शक्यता आहे. मात्र पैसे नेमक्या कोणत्या दिवशी जमा होतील, याबद्दल अजून कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. ३१९ कोटी ५३ लाखांचा निधी वर्ग जुलै महिन्याचा हप्ता वेळेत देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाअंतर्गत येणाऱ्या अनुसूचित जाती घटकातल्या पात्र महिलांसाठी राज्य सरकारने ३१९ कोटी ५३ लाख रुपये महिला व बालविकास विभागाकडे वर्ग केले आहेत. त्यामुळे लवकरच हप्ता येण्याची प्रोसेस सुरू असल्याचं स्पष्ट होत आहे.जुलै महिन्याचा हप्ता अद्याप अनेक महिलांच्या खात्यात जमा झालेला नाही.

# उदय सामंतांना उपमुख्यमंत्री व्हायचंय,एकनाथ शिंदेंना टार्गेट करण्यासाठी त्यांनीच मनोज जरांगेला सुपारी दिलेय; नवनाथ वाघमारेंचा सनसनाटी आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**-उद्या राज्यात मराठा आणि ओबीसी समाजातील तणाव वाढून त्यांच्यात दंगल झाली तर त्यासाठी दोन नेते जबाबदार असतील, ते म्हणजे उदय सामंत आणि प्रसाद लाड. हे दोन्ही नेते मनोज जरांगे यांना आर्थिक रसद पुरवून हा विषय तापता ठेवत आहेत. उदय सामंत यांना आता उपमुख्यमंत्री व्हायची स्वप्नं पडत आहेत. त्यामुळे तो मनोज जरांगे याला भुंकायला सांगत आहे, सुपारी देऊन एकनाथ शिंदे यांना टार्गेट करायला सांगत आहे, असा सनसनाटी आरोप ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी केले. ते जालन्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी मनोज जरांगे, उदय सामंत आणि प्रसाद लाड यांच्यावर जहरी शब्दांत टीका केली.एकनाथ शिंदे यांनी गद्दारीचा ठसा पुसण्यासाठी मनोज जरांगेच्या खांद्यावर बंदूक ठेवून मराठा समाजाला जवळ केले. पण आता मनोज जरांगे त्यांच्यावरच उलटला आहे. उदय सामंत याला आता सतत उपमुख्यमंत्री व्हायची स्वप्नं पडत आहेत. त्यामुळे तो एकनाथ शिंदे यांना टार्गेट करण्यासाठी तो मनोज जरांगे यांना भुंकायला सांगत आहे. लवकरच उदय सामंत हे भाजपवासी




झालेले दिसतील, असा दावा नवनाथ वाघमारे यांनी केला. मध्यंतरी उदय सामंत हे भाजपच्या संपर्कात होते. उदय सामंतहे शिवसेनेतील एक गट फोडण्याच्या तयारीत होते. उदय सामंत शिंदे गटात अस्थिर आहेत. त्यांच्याकडे उद्योग खाते आहे, या माध्यमातून ते मनोज जरांगेला कोट्यवधी रुपये देऊन एकनाथ शिंदेंच्या विरोधात बोलायला सांगत आहेत. जेणेकरुन एकनाथ शिंदे यांचे अस्तित्व कमी होईल. यानंतर शिवसेना आमदारांचा एक गट फोडण्याची उदय सामंत यांनी योजना आहे, असे नवनाथ वाघमारे यांनी म्हटले. तसेच प्रसाद लाड यांना मंत्रिपदाची स्वप्नं पडू लागली आहे. मनोज जरांगेने मुख्यमंत्र्यांवर टीका केल्यावर ते लगेच उत्तर द्यायला येतात. मात्र, तेच मनोज जरांगे याला रसद पुरवून चर्चेत राहण्याचा प्रयत्न करत आहेत. प्रसाद लाड याला सरकारने अनेक टेंडर दिले आहे. या माध्यमातून त्याने अमाप संपत्ती गोळा केली आहे. प्रसाद लाड यांनी अमाप संपत्ती गोळा केली आहे. राज्य सरकारनेच दूध पाजलेय या सापाला, तोच आता त्यांना डसतोय उद्या राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी दंगल झाली तर उदय सामंत-प्रसाद लाड हे दोन नेते जबाबदार असतील. तेच मनोज जरांगे यांना रसद पुरवत आहेत. मनोज जरांगे यांच्याकडे लक्ष देऊ नका. पण हे दोघे कुठे जाताहेत यावर सरकारने लक्ष ठेवावे. या दोघांनी रसद पुरवली नाही तर मनोज जरांगे काहीच करु शकत नाही. ओबीसी समाजाचे आरक्षण संपवण्यासाठी उदय सामंत आणि प्रसाद लाड या दोघांना पुढे केले जात आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यांनी या दोघांपासून सावध राहिले पाहिजे, असे नवनाथ वाघमारे यांनी म्हटले.

# मोठं होऊन पत्रकार होणार का? राज ठाकरेंच्या प्रश्नावर 'त्या' चिमुकल्या मुलींनी दिलं असं उत्तर; ऐकून मनसे अध्यक्षही चकीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई-**
राज्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था आणि यामुळे सर्वसामान्यांना होणारा त्रास हा काही नवा नाही. या त्रासावर शाळकरी मुलींनी तयार केलेली एक रिल सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाली. रायगड जिल्ह्यातल्या कोंदिवडे गावातील शाळकरी मुलींनी हातामध्ये छत्रीचा माईक म्हणून वापर करत रिपोर्टिंग केल्याच्या या व्हिडीओची राज्यभरात जोरदार चर्चा झाली. त्यानंतर सोशल मीडियावर अशाच प्रकारचे शाळकरी मुलांनी अनेक व्हिडीओ तयार करून पोस्ट केले. पण कोंदिवडे गावातील विद्यार्थिनींमुळे राज्यातील रस्त्यांच्या दुरावस्थेची ही मोहिम सुरू झाली. या शाळकरी मुलींनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची दादर येथील शिवतीर्थ या निवासस्थानी भेट घेत संवाद साधला.

कोंदिवडे गावातील शाळकरी मुलींनी राज ठाकरे यांची भेट घेत त्यांच्यासोबत बराच वेळ गप्पा मारल्या. यावेळी राज ठाकरे यांनी त्यांना अनेक प्रश्न विचारे त्यावर मुलींनी देखील जबरदस्त उत्तर दिली ते ऐकून राज ठाकरे थक्क झाले. यावेळी राज ठाकरे यांनी या मुलींना भेटवस्तू देत त्यांचा सन्मान केला. या मुली कोणत्या वर्गात शिकतात? आणि त्यांना मोठं होऊन काय




बनायचं आहे ? असे अनेक प्रश्न राज ठाकरे यांनी केले. चांगले शिक्षण घेऊन चांगला अभ्यास करण्याचा सल्ला राज ठाकरे यांनी यावेळी या मुलींना दिला.

तुम्ही मोठं होऊन कोण होणार, रिपोर्टर होणार आहात का? असा प्रश्न राज ठाकरे यांनी या मुलींना केला. त्यावर यापैकी एका मुलीने मला स्टेनो व्हायचंय, दुसऱ्या मुलीने युट्यूबर व्हायचंय, तर तिसऱ्या मुलीने स्केच आर्टिस्ट व्हायचंय असं सांगितले. यावेळी राज ठाकरे यांनी या मुलींना तुम्ही अभ्यास करता का? असा देखील प्रश्न विचारला. यावर उत्तर देताना या मुलींनी हो आम्ही अभ्यास करतो असे उत्तर दिले.यावेळी राज ठाकरे यांनी या मुलींना मुलखती बंद करा. सध्या अभ्यास महत्वाचा आहे त्यामुळे अभ्यास करा असा सल्ला दिला.

## संपादकीय ......

# बुद्धिजीवी नक्षलवादी नेमके कोण?

*लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात 'दिमागी नलक्ष' असल्याचा उल्लेख केल्याने या विषयावर समर्थन, वादविवाद टीका टीपण्णी केली जात आहे. स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून पंतप्रधानांचा संदेश हा देशवासियांसाठी असतो. त्यामुळे त्यात राजकीय विधानांपेक्षा सर्वसमावेशक विकास आणि धोरणांची माहिती मिळण्याची अपेक्षा नागरिकांना असते. स्वातंत्र्यदिनाचे भाषण हे राजकीय टीकेपेक्षा देशाची आर्थिक, विकासविषयक दिशा ठरवण्याची परंपरा आहे. विद्यमान पंतप्रधानांचे लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करणारे हे १३ वे भाषण होते. या भाषणातून पंतप्रधानांनी नक्षलवादाचा केलेला उल्लेख गैरलागू असल्याचा आरोप होत आहे.*

*नक्षलवादाची सुरुवात १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील सिलिगुडी उपविभागातील नक्षलबारी या छोट्याशा गावातील शेतकरी आंदोलनातून झाली. या आंदोलनाला या ठिकाणाहून नक्षलवाद असे नाव पडले. गरीब आदिवासी, अल्पभूधारक शेतकर्यांचे जमीनदारांकडून होणार्या शोषणाविरोधात झालेल्या आंदोलनाने हिंसक वळण घेतल्यानंतर या आंदोलनाला नकारात्मक ठरवण्यात आले. त्यामुळे गरजू शेतकर्यांच्या जमीनदार आणि भांडवलवादी व्यवस्थेकडून होणार्या शोषणाचा मुद्दा बाजूला पडला. या चळवळीतील हिंसेमुळे चळवळीला लोकांचे समर्थन मिळाले नाही. हिंसेच्या समर्थनाला लोकशाहीत स्थान नाहीच, परंतु प्रतिक्रिया किंवा नाईलाज म्हणून हिंसेला कारण ठरणार्या सामूहिक घटकांचे शोषण दुर्लक्षित करणे, म्हणजेही लोकशाही नाही. कालांतराने नक्षबारीतील भांडवलवादी जमीनदारी विरोधातील नक्षलवादी चळवळीला असलेली सहानुभूती संपुष्टात आली. नक्षलवादाचा उदय हा येथील लोकशाहीच्या पराभवाचा परिणाम असल्याचे मान्य करावे लागेल.*

*लोकशाहीत सशस्त्र क्रांतीला कोणतीही जागा नाही, हे स्पष्ट व्हावे. पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून दिमागी नक्षलवादाचा विषय कोणाला उद्देशून संबोधला होता, यात संदिग्धता आहे. सत्तेने संदिग्ध विधाने करून गोंधळ निर्माण करण्याची ही पहिलीच वेळ नाही. याहीआधी अर्बन नक्षलवादी या संकल्पनेचा वापरही सत्तेने केला आहे. यात सत्तेकडून या विषयाचा थेट उल्लेख किंवा आरोप केला जात नाही, तर मोघम असे विधान केले जाते. त्यामुळे गोंधळ निर्माण होतो, असा गोंधळ निर्माण करून वैचारिक वातावरण भ्रमित करण्याचाच उद्देश यातून साध्य होतो. अर्बन नक्षलवादाच्या मुद्द्यावरही हेच करण्यात आल्याचा इतिहास अगदी अलीकडचा आहे. वैचारिक किंवा दिमागी नक्षवादाचा अर्थ ज्यांच्या विचारात किंवा मेंदूमध्ये नक्षलवादी विचारसरणी काम करते असा काढता येऊ शकतो. यातही नक्षलवादी म्हणजे नेमकी कोणती विचारसरणी, असा प्रश्न यात समोर येतो.*

*नक्षलवादी किंवा कोणत्याही चळवळीच्या नावाने होणारी हिंसा अमान्यच आहे. या देशाने हिंसक चळवळीला स्थान दिलेले नाही, हा इतिहास असल्याने माओ, लेनिनवादी हिंसेला इथे स्थान नाही. असे असतानाही लाल किल्ल्यावरून दिमागी नक्षलवादाच्या उल्लेखामागे सत्तेकडून देशात वैचारिक संभ्रम निर्माण करण्याचा उद्देश होता का, असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. पंतप्रधानांच्या यंदाच्या भाषणात तरुणाई अर्थात जेन झींच्या प्रश्नांवर देण्यात आलेला भर स्वागतार्ह आहे. सर्वाधिक तरुणांचा देश म्हणून देशाचा नावलौकिक असताना तरुणांच्या म्हणण्याला डावलणे हितावह नाही, हे सत्ताधार्यांच्या उशिराने का होईना लक्षात आले, हेही नसे थोडके. पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात तरुणांच्या रोजगार आणि शिक्षणाच्या अनुषंगाने माहिती तंत्रज्ञानातील वेगाने बदलणार्या अत्याधुनिक कौशल्यविकाचा मुद्दा अधोरेखित केला हे खरेच, म्हणजेच येथील तरुणांच्या मेंदू आणि बुद्धीवर पंतप्रधानांनी दाखवलेल्या विश्वासाचे स्वागतच व्हायला हवे, असे असताना त्याच भाषणात दिमागी नक्षवादाचा मुद्दा मांडून पंतप्रधानांना नेमके काय म्हणायचे होते. एकाच भाषणात अशी परस्परविरोधाभासी विधाने करून वैचारिक संभ्रम निर्माण होणार नाही का? जे लोकशाहीत विरोधक आहेत त्यांना दिमागी नक्षलवादी ठरवण्यासाठी पंतप्रधानांचे विधान होते का, आदी प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.*

*नक्षलबारीच्या उठावाचे वैचारिक आणि सहानुभूतीचे अधिष्ठान या चळवळीत झालेल्या हिंसेनंतर कधीचेच निकालात निघाले आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी असा केलेला उल्लेख आज गैरलागू ठरतो. नक्षलवादासोबत अर्बन, दिमागी या शब्दांचा जोडवापर राजकीय हेतूने झाल्याचे नवे नाही, परंतु ज्यावेळी देशाचे पंतप्रधान लाल किल्ल्यावरून असे शब्द आपल्या भाषणातून वापरतात त्यावेळी त्याचे गांभीर्य वाढलेले असते. दिल्लीतील जंतर मंतरवरील जेन झींच्या आंदोलनानंतरच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणातून पंतप्रधानांनी केलेला संबंधित उल्लेख हा आंदोलनाच्या यशस्वीतेचा परिणाम मानावा काय, सरकारच्या मनातील तरुणांच्या आंदोलनाची धास्ती अजून कमी झालेली नाही, असाही त्याचा अर्थ काढला जाऊ शकतो. राजकीय विरोधकांना नक्षलवादी, देशद्रोही ठरून विरोध मारू काढणे हे लोकशाहीत योग्य नाही. निकोप लोकशाहीसाठी विरोधकांची भूमिका महत्वाची असते. विरोधकांचे म्हणणेही ऐकून घेण्याची सहनशक्ती सत्ताधार्यांमध्ये असावी लागते. नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांचे ऐकून घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा संसदेत उपस्थित राहिले नाहीत, याला काय म्हणावे. अगदी शेवटी उपचार म्हणून हजर राहिले. आजच्या तरुणाईला रोजगार, संधी आणि शिक्षणाचे प्रश्न जास्त महत्वाचे वाटत आहेत. हिंसेवर त्यांचा विश्वास नाही. लेनिन-माओपेक्षा गांधी, आंबेडकर ही नावे त्यांच्या जवळची आहेत. त्यांचा लोकशहीवर विश्वास आहे, या विश्वासावर पंतप्रधानांनी पुरेसा विश्वास ठेवायला हवा.*

# तळेगाव ठाकूर येथे पारंपरिक पद्धतीने नागपंचमी उत्साहात

## वारुळाची विधिवत पूजा; महादेव मंदिर व जगदीश महाराज मंदिरात आरती,

सुनील घोरमाडे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७तळेगाव ठाकूर :** तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे श्रावण महिन्यातील पवित्र नागपंचमीचा सण पारंपरिक पद्धतीने मोठ्या श्रद्धा व उत्साहात साजरा करण्यात आला. गावातील ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, शेतमजूर तसेच महिलांनी या धार्मिक सोहळ्यात सहभागी होत पिढ्यान्पिढ्या चालत आलेली नागपूजनाची परंपरा जपली.

नागपंचमीच्या दिवशी सकाळी गावाजवळील वारुळावर ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत विधिवत पूजा करण्यात आली. वारुळाला केळीचे पान, विडे, नारळ, काकड्या, लिंबू, फुले आदी साहित्य अर्पण करून नागदेवतेचे पूजन करण्यात आले. यावेळी पारंपरिक पद्धतीने लाह्या-फुटाणे व दूध वारुळात अर्पण करण्यात आले.

नागराजाची पारंपरिक मंत्रोच्चारासह आरती करून पावसाळा चांगला व्हावा, पिके जोमाने यावीत आणि शेतकऱ्यांचे संकटांपासून संरक्षण व्हावे, अशी प्रार्थना करण्यात आली.पूजेनंतर पूजेचे साहित्य नदीमध्ये विसर्जित करण्याची परंपरा पाळण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांनी रस्त्याने पारंपरिक पद्धतीने 'बाऱ्या' म्हणत गावातील महादेव मंदिर गाठले. तेथे महादेवाची पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर गावातील प्रमुख जगदीश महाराज मंदिरात जाऊन पूजा, आरती व पारंपरिक 'बाऱ्या' म्हणत नागपंचमीच्या धार्मिक कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### 'बाऱ्या' म्हणत परंपरेचे जतन..



जुनी परंपरा जपण्याचा ग्रामस्थांचा संकल्प

नागपंचमीच्या निमित्ताने गावात एकत्रितपणाची भावना निर्माण झाली. आधुनिक काळातही पूर्वजांनी जपलेल्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम या माध्यमातून होत असल्याचे ज्येष्ठ नागरिकांनी सांगितले. सामूहिक पूजनामुळे गावातील सामाजिक सलोखा आणि एकोपाही दृढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले.नागपंचमी हा केवळ धार्मिक श्रद्धेचा सण नसून मानव आणि निसर्ग यांच्यातील नाते अधोरेखित करणारा दिवस आहे. साप व इतर वन्यजीव हे पर्यावरणीय साखळीतील महत्त्वाचे घटक असून त्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. त्यामुळे नागपंचमीच्या निमित्ताने वन्यजीवांचे रक्षण, निसर्ग संवर्धन आणि जैवविविधतेचे महत्त्व जपण्याचा संदेशही ग्रामस्थांनी दिला. तळेगाव ठाकूर येथील ही पारंपरिक नागपंचमी गावाच्या धार्मिक श्रद्धेसोबतच निसर्गप्रेम, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक वारसा जपणारी ठरली.

### शेतकरी-मजूर वर्गाकडून कामाला सुटी

नागपंचमीच्या दिवशी गावातील शेतकरी व शेतमजूर कामाला जात नसल्याची परंपरा आजही कायम आहे. शेतकरी शेतात जाऊन लाह्या-फुटाणे अर्पण करतात. शेतातील नागदेवतेच्या वसतिस्थानाची फुलांनी सजावट करून त्याचे पूजन केले जाते. नागराज हा शेतकऱ्याचा मित्र मानला जात असल्याने त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची ही परंपरा श्रद्धेने जपली जाते.गावातील महिला व नागरिकांनीही आपापली दैनंदिन कामे बाजूला ठेवून नागपूजनात सहभाग घेतला. दूध, फुले व फळे अर्पण करून कुटुंबाचे सुख-समृद्धी, चांगला पाऊस आणि पिकांचे संरक्षण यासाठी प्रार्थना करण्यात आली.

# महिला महाविद्यालयात 'स्पेक्ट्रम' भित्तीपत्रकाचे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालय, अमरावती येथे स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर कनिष्ठ विभागाच्या इंग्रजी विभागातर्फे 'स्पेक्ट्रम' या भित्तीपत्रकाचे उद्घाटन १५ ऑगस्ट रोजी करण्यात आले. यावेळी मंडळाचे ज्येष्ठ उपाध्यक्ष श्री. कसबेकर, उपाध्यक्ष श्री. निनाद सोमण, मंडळ प्रतिनिधी श्री. रवींद्रजी खांडेकर, श्री. प्रदीप पात्रीकर, सचिव श्री. हितेश व्यास आणि प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थिनींमधील इंग्रजी भाषेची भीती दूर करून त्यांच्यात इंग्रजी भाषेविषयी आवड निर्माण करणे, तसेच वाचन व लेखनासह भाषिक कौशल्यांचा विकास करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. इंग्रजी विभागातर्फे दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन केले जाते. विद्यार्थिनी दर महिन्याला विविध विषयांवर कल्पकतेने व नाविन्यपूर्ण पद्धतीने भित्तीपत्रके तयार करतात. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना आपल्या सर्जनशील अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर यांनी केले. प्रा. अपर्णा तीनखेडे व प्रा. सचिन साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनी



स्वातंत्र्य दिन, शिक्षक दिन, गांधी जयंती, निसर्ग, विविध सणांचे महत्त्व, स्त्री सक्षमीकरण, भारतीय परंपरा व संस्कृती आणि खेळांचे महत्त्व अशा विविध विषयांवर वाचन व लेखन करतात.विद्यार्थिनींच्या सर्जनशील लेखनाला सातत्याने व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य इंग्रजी विभागाकडून केले जात आहे. या उपक्रमाचे नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. आनंद परचुरे, सचिव श्री. हितेश व्यास, उपाध्यक्ष श्री. निनाद सोमण यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी कौतुक करून विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी सोनपरोते यांच्यासह सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.



# विद्याभारती महाविद्यालयात देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा

## विद्यार्थ्यांनी सादर केल्या दर्जेदार कलाकृती, विजेत्यांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती**

अमरावती येथील कॅम्प स्थित विद्याभारती महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्याभारती शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब शेखावत यांच्या वाढदिवसानिमित्तही हा कार्यक्रम घेण्यात आला. जेम्सच्या अध्यक्षा मंजीरीताई शेखावत यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्याभारती शैक्षणिक संस्थेच्या उपाध्यक्ष मेजर प्राचार्य डॉ. एम. एम. राठौर होत्या. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष रघुनाथ रोडे, प्रतिभाताई पाटील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. व्ही. शिरभाते, विद्याभारती फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पांडे, आयटीआयचे प्राचार्य



जी. बी. तंवर, डॉ. पी. एस. येनकर, विद्याभारती जेम्सचे समन्वयक तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एच. के. सिसोदिया, जेम्स कोर कमिटी सदस्य प्रा. अथर इक्बाल, प्रा. लविना गोन्सालविस, प्रा. निलेश डवले आणि डॉ. सुरज रोडे उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. एम. एम. राठौर यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि व्यक्तिमत्त्व विकास व्हावा या उद्देशाने जेम्सतर्फे वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात, असे प्रतिपादन केले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये धैर्य निर्माण होऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार मिळतो, असेही त्यांनी नमूद करत सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.सकाळी ९.३० वाजता सुरू झालेल्या या स्पर्धेत विविध शाखांतील एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये 'सोलो' (एकलगान) प्रकारात २५ विद्यार्थ्यांनी, तर 'समूहगीत' प्रकारात ४ ग्रुपनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. स्पर्धेचे परीक्षण राजेश परमार, प्रा. शैलेश जावरकर आणि प्रा. वैभवी चापोरकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन झुबिया अहमद, यतिका भटकर, सेजल सस्ते आणि काव्या एरूळकर यांनी केले. जेम्सच्या विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध संयोजनात आणि उल्हासपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे: समूहगीत स्पर्धेत गौरी प्रधान आणि ग्रुप (११ वी) यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर ओम ठाकरे आणि ग्रुप (डी. फार्म भाग २) यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. सोलो (एकलगान) स्पर्धेत हिमांशी शिस्ते (बी.एस्सी भाग १) प्रथम, माही गिरे (बी.कॉम भाग २) द्वितीय आणि म्रिष्ठा मुजुमदार (बी. ए. भाग १) तृतीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या.

# एका क्लिकवर पहिले ते बारावी चे सर्व पुस्तके ई बालभारती वर उपलब्ध

**विदर्भा प्रजासत्ताक**

**दि.१७ अमरावती**

नवीन शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी, तिसरी आणि सहावीचा अभ्यासक्रम बदलण्यात आला. या बदलामुळे शाळा सुरू झाल्यानंतरही विद्यार्थ्यांना वेळेत नवीन छापील पुस्तके मिळण्यात अडचणी आल्या. सुरुवातीला अनेक शाळांमध्ये नवीन पुस्तकांचा तुटवडा निर्माण झाल्याची ओरड विद्यार्थी व पालकांकडून ऐकायला मिळाली. त्यामुळे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात होती. मात्र, आता 'ई-बालभारती' संकेतस्थळावर पीडीएफ स्वरूपात इयत्ता पहिली ते बारावीची पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे हवं ते पुस्तक आता एका क्लिकवर मिळवता येणार आहे.

पहिली ते बारावीपर्यतच्या सर्व माध्यम व विषयांची पाठ्यपुस्तके आता 'ई-बालभारती'वर उपलब्ध असल्याने पालकांची आर्थिक बचत होणार आहे. दरवर्षी शाळा सुरू होताच बाजारात ठराविक इयत्तांची पुस्तके उपलब्ध नसणे किंवा उशिरा मिळणे अशा तक्रारी टाळण्यासाठी असतात. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने (बालभारती) आता सर्व पुस्तके डिजिटल स्वरूपात आणली आहेत.

विद्यार्थी, शिक्षक, पालक आपल्या मोबाइलसह संगणकावर एका क्लिकवर ही पुस्तके डाऊनलोड करू शकतात. तंत्रज्ञानाचा हा वापर विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरणारा आहे. विशेष म्हणजे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थीही या पुस्तकातून अभ्यास करतात. त्यासाठी त्यांना संबंधित विद्यार्थ्यांकडून पुस्तकांची मागणी करावी लागायची. बाजारातून पुस्तके विकत घेतल्यास अतिरिक्त खर्चही सहन करावा लागत होता. मात्र, एका क्लिकवर हवे ते पुस्तक सहज उपलब्ध होत असल्याने पुस्तकांचा संग्रह सोबत ठेवता येणार आहे.

# कावड यात्रेने अमरावतीत भक्तिमय वातावरण; आ. रवि राणा यांची उपस्थिती

**विदर्भा प्रजासत्ताक**

**दि.१७ अमरावती :** श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त शिवशक्ती धाम मित्र मंडळ, कल्याण नगर चौक यांच्या वतीने भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. सात पवित्र तीर्थस्थळांवरून आणलेल्या जलाने सजलेल्या कावडी घेऊन मोठ्या संख्येने शिवभक्तांनी 'हर हर महादेव' आणि 'जय भोलेनाथ'च्या जयघोषात कावड यात्रा काढली.





महाराष्ट्र विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष तथा आमदार रवि राणा यांनी यात्रेला सदिच्छा भेट देत कावडधारी भाविकांचा उत्साह वाढविला. त्यांनी भाविकांशी संवाद साधून भगवान महादेवांचे दर्शन व आशीर्वाद घेतले यावेळी आ. राणा म्हणाले की, श्रावणातील कावड यात्रा ही श्रद्धा, भक्ती आणि भगवान महादेवावरील अढळ विश्वासाचे प्रतीक आहे. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने अमरावतीत भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, समाजात एकता, सद्भावना आणि सकारात्मक ऊर्जा वाढावी, हीच महादेव चरणी प्रार्थना असल्याचे त्यांनी सांगितले. यात्रेत श्री महाकाली माता शक्तीपीठाचे पीठाधीश्वर श्री शक्ती महाराज, शिक्षण सभापती ॲड. प्रिती रेवने यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, आयोजक व मोठ्या संख्येने शिवभक्त सहभागी झाले होते.

# शकुंतलेचा लोकजागर; देशभक्तीच्या सुरांत लहरला तिरंगा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती-** स्वातंत्र्य दिनानिमित्त शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीच्या वतीने सलग आठव्या वर्षी ४१व्या टप्प्यातील अहिंसक जनआंदोलन करण्यात आले. रेल्वे स्टेशन परिसरात देशभक्ती गीतांसह 'शकुंतला सुरू झालीच पाहिजे'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. सकाळी ९.१० वाजता वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर कार्यक्रमाध्यक्ष आरएफओ सुशांत काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नगराध्यक्ष रुपाली माथने, मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड, आरएफओ पवन बावनेर यांच्यासह मान्यवरांनी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन केले.स्वरांगणचे संचालक संजय ठाकरे, सुधीर ठवली, अमित घटके व संतोष नरेडी यांनी देशभक्तीपर गीतांमधून जनजागृती केली. यावेळी विविध सामाजिक संस्था, पदाधिकारी, सत्याग्रही आणि शेकडो नागरिक सहभागी झाले.रेल्वे प्रशासनाकडून स्टेशनच्या स्वच्छतेसह मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप सत्याग्रहींनी केला. उत्तर भारतात रेल्वेचे विस्तृत जाळे असताना पश्चिम विदर्भ मात्र मागे का, असा सवाल उपस्थित करत शकुंतला रेल्वे पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. योगेश खानझोडे यांनी शकुंतला रेल्वेच्या इतिहास व संघर्षाची माहिती दिली.

# ५३० कोटी खर्च करून निर्माण केलेल्या नांदगावपेठ पांढुर्णा राष्ट्रीय महामार्गाची थातूरमातूर दुरुस्ती !

## निकृष्ट दर्जाची कामे बंद करून दर्जेदार काम करण्याची रुपेश वाळके यांची मागणी !

### सिमेंट रस्त्यावर शेकडो ठिकाणी भेगा, खड्डे; धोकादायक पुलांची कामे अपूर्ण !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मोर्शी–** शासनाने कोट्यावधी रुपये खर्च करून निर्माण केलेल्या नांदगावपेठ–मोर्शी–वरूड–पांढुर्णा राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे आणि भेगा पडल्या असतांना यामध्ये झालेल्या अपघातामध्ये शेकडो नागरिकांचे बळी गेले असून अनेकांचे संसार उध्वस्त झाले असतांना आता त्याच खड्डे आणि भेगांमध्ये केवळ डस्ट, जळलेले ऑइल व इतर साहित्य टाकून वरवरची दुरुस्ती करून नागरिकांच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा होत असलेला गंभीर प्रकार राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष रुपेश वाळके यांनी उघडकीस आणला असून राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेली निकृष्ट दर्जाची थातुरमातुर दुरुस्तीची कामे तत्काळ बंद करून खराब झालेल्या सिमेंट रस्त्याची केवळ डागडुजी न करता तांत्रिक पद्धतीने खोदून नव्याने रस्ता तयार करण्यात यावा अशी मागणी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्याकडे केली आहे.

अमरावती जिल्ह्यातील नांदगावपेठ–मोर्शी–वरूड ते मध्यप्रदेशातील पांढुर्णा यांना जोडणाऱ्या सुमारे ९६ किलोमीटरच्या राष्ट्रीय महामार्गाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तब्बल ५३० कोटींचा खर्च करून अवघ्या काही वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठ्या भेगा, खड्डे, रस्ता दबणे आणि पॅनेल खराब होण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. त्यामुळे वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.




नांदगाव पेठ पांढुर्णा राष्ट्रीय महामार्गावर साडेचार मीटरच्या आसपासचे अनेक सिमेंट पॅनेल तयार करण्यात आले आहेत. या पॅनेलपैकी अनेक ठिकाणी भेगा पडल्याने रस्त्याची अवस्था खराब झाली आहे.

काही ठिकाणी रस्ता दबल्यामुळे वाहनांना अचानक धक्का बसतो. विशेषतः दुचाकीस्वारांना याचा मोठा धोका निर्माण झाला असून, रात्रीच्या वेळी हे खड्डे आणि दबलेला रस्ता अधिक धोकादायक ठरत आहे. ज्या उद्देशाने जुना खड्डेमय डांबरी रस्ता बदलून कोट्यवधी रुपये खर्च करून सिमेंटचा नवीन राष्ट्रीय महामार्ग तयार करण्यात आला, तोच महामार्ग काही वर्षात खराब होत असेल तर जबाबदार कोण? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभाग 'कुंभकर्णी झोपेत' असल्याचा आरोप नागरिकांतर्फे करण्यात येत असून महामार्गावरील समस्यांबाबत राष्ट्रीय महामार्ग विभाग तसेच संबंधित कंत्राटदाराकडे वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित दखल घेतली जात नसल्यामुळे नागरिकांच्या जीविताशी खेळ सुरूच राहिला तर राष्ट्रीय महामार्गावर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष रुपेश वाळके यांच्यातर्फे राष्ट्रीय महामार्ग विभागाला देण्यात आला आहे.

> **५३० कोटींच्या कामाची गुणवत्ता तपासा !**
>
> नांदगावपेठ ते पांढुर्णा या महामार्गाच्या कामाचे दोन टप्पे करण्यात आले. नांदगावपेठ ते मोर्शी हा सुमारे ४३ किलोमीटरचा टप्पा असून त्यासाठी सुमारे २४० कोटी, तर मोर्शी ते पांढुर्णा हा सुमारे ५३ किलोमीटरचा टप्पा असून त्यासाठी सुमारे २९० कोटी खर्च झाल्याचे सांगण्यात येते.मात्र एवढा मोठा निधी खर्च करून तयार केलेल्या रस्त्यावर अल्पावधीतच भेगा आणि खड्डे पडत असतील, तर बांधकामाच्या गुणवत्तेची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करण्याची आवश्यकता आहे.
>
> **रुपेश वाळके** अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्ष मोर्शी तालुका.

# शैक्षणिक परिसरातील २५७ पानठेले बंद




> नशामुक्त युवा सुरक्षित समाज या संकल्पनेनुसार पालक, शिक्षक, विद्यार्थी, दुकानदार व नागरिकांनी अभियानास सहकार्य करावे. तसेच शैक्षणिक परिसर नशामुक्त व तंबाखूमुक्त ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा. शैक्षणिक परिसरात अंमली पदार्थ, तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, सेवन करणार्‍यांवर कारवाई केल्या जाईल.
>
> – **कुमार चिंता,** पोलिस अधीक्षक, यवतमाळ.

## पोलिस प्रशासनाची मोहीम; कोटपा अंतर्गत ३८० कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७यवतमाळ**

गेल्या दीड महिन्यात पोलिसांनी जिल्ह्याभरात शाळा, महाविद्यालय परिसरातील पानठेल्यावर कारवायांचे सत्र राबविले. दरम्यान, कोटपा कायद्यांतर्गत ३८० कारवाई करण्यात आल्या असून, २५७ पानठेले बंद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे ९८० शाळा, महाविद्यालय तंबाखुमुक्त व नशामुक्त झाल्या आहेत. जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालय परिसरात अंमलीपदार्थ व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, वापरास प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलिस दलाने एक जुलैपासून विशेष मोहिम राबविली आहे. या कालावधीत विशेष तपासणी पोलिसांनी केली. यात प्रामुख्याने अंमली पदार्थ, तंबाखूजन्य पदार्थांची विक्री व सेवन करणार्‍यांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. यात प्रामुख्याने कोटपा कायदा २००३ अन्वये शैक्षणिक परिसरात एकूण ३८० कारवाया करण्यात आल्या आहेत. यात प्रामुख्याने २५७ पानठेले बंद करण्याचे निर्देश देण्यात आले असून, ९८० शाळा, महाविद्यालय तंबाखूमुक्त व नशामुक्त झाल्या आहेत. अभियानादरम्यान शैक्षणिक परिसराच्या आजूबाजूला तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणार्‍या दुकानदार तसेच नियमांचे उल्लंघन करणार्‍यांची तपासणी केली. या कारवाई जप्त केलेला तंबाखूजन्य पदार्थांची विल्हेवाट लावण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी हे अंमल पदार्थ व तंबाखूच्या व्यसनापासून दूर राहावे, यासाठी पोलिस विभागाकडून जनजागृती समुपदेशन व प्रतिबंधात्मक उपाय योजनांवर विशेष भर देण्यात आला आहे. शैक्षणिक परिसरात अंमली पदार्थ अथवा तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, सेवन करणार्‍यांविरोधात सातत्याने कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# शिक्षक बँकेची आमसभा विविध मुद्द्यांवर गाजली

## मृत सभासद कल्याण निधी, नवीन सभासद वाढीचा मुद्दा तापला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती–** मृत सभासद कल्याण निधीच्या रकमेत वाढ करण्यासोबतच महसूल कर्मचाऱ्यांना शिक्षक बँकेचे सभासदत्व देण्याच्या मुद्द्यावरून जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेच्या आमसभेत चांगलीच गरमागरम चर्चा झाली. या मुद्द्यांवर काही सभासद तसेच सत्ताधाऱ्यांमध्ये खडाजंगीसुद्धा झाली. विशेष म्हणजे बँकेच्या मृत सभासदाच्या कुटुंबीयांना देण्यात येणाऱ्या कल्याण निधीची रक्कम ३० लाखांपर्यंत करण्याचा महत्त्वाचा ठराव या आमसभेत पारित करण्यात आला. जि. प.



शिक्षक सहकारी बँकेची आमसभा अध्यक्ष गोकुलदास राऊत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बँकेकडून मृत पावणाऱ्या सभासदांच्या कुटुंबीयांना सध्या प्रत्येकी २० लाख रुपये मदत दिली जाते, त्यामध्ये वाढ करण्याचा आग्रह सभासदांनी धरला. मात्र त्यासाठी प्रीमियमची रक्कम वाढवावी लागेल, असे अध्यक्षांनी सांगितले. या विषयावर पंकज गुल्हाने, प्रभाकर झोड, सुनील कुकडे, सुनील केने आदींनी आपले मत व्यक्त केले. सभासदांचे प्रीमियम वाढवून त्यांना वाढीव आर्थिक मदत देण्याची मागणी त्यांनी रेटून धरली. त्यानंतर सभागृहात मृत कल्याण निधीमध्ये ३० लाखांची वाढ करण्यात येत असल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

> नाशिक, वर्धा तसेच अन्य काही जिल्ह्यांमधील शिक्षक सहकारी बँकांमध्ये महसूल कर्मचाऱ्यांना सभासदत्व देण्यात आल्यामुळे त्या बँकांना फायदाच झाला आहे. तोच प्रयोग अमरावती जि. प. शिक्षक सहकारी बँकेत करण्याचा संचालक मंडळाचे नियोजन होते. मात्र, सभासदांना ते नको असेल तर आमचा आग्रह नाही.
>
> **–गोकुलदास राऊत,** अध्यक्ष.

शिक्षक बँकेचे सभासद म्हणून बदली न होणाऱ्या अमरावती विभागातील महसूल कर्मचाऱ्यांना परवानगी देण्याचा ठराव अध्यक्ष गोकुलदास राऊत यांनी मांडला. बँकेच्या आर्थिक हितासाठी ते फायदेशीर असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र त्यावर सभासदांनी आक्षेप नोंदविला. पंकज गुल्हाने, सुनील कुकडे यांच्यासह काही सभासदांनी त्याला विरोध दर्शविला. त्यामुळे महसूल कर्मचाऱ्यांना बँकेचे सभासदत्व मिळण्याचा रस्ता सध्या तरी धुसर झाला आहे. आमसभेला उपाध्यक्ष सुरेंद्र मेटे यांच्यासह संचालक तुळशीदास धांडे, प्रफुल्ल शेंडे, मो. नाजीम अ. गफ्फार, कैलास कडू, उमेश चुनकीकर, अजयानंद पवार, रामदास कडू, रा. ना. गावंडे, मनीष काळे, विजय कोठाळे, संभाजी रेवाळे, राजेश गाडे, सरिता काठोळे, संगीता तडस, ॲड. राजपाल वानखडे, ॲड. मो. शकील अहमद मो. गयास, सरव्यवस्थापक संजय साळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

> **मनपा, नपा शिक्षक व कर्मचाऱ्यांना मिळणार सभासदत्व**
>
> आतापर्यंत केवळ जिल्हा परिषदेचे शिक्षक व कर्मचाऱ्यांनाच बँकेचे सभासदत्व मिळत होते. मात्र रविवारी झालेल्या आमसभेत महापालिका व नगरपालिकेंतर्गत कार्यरत शिक्षक तसेच कर्मचाऱ्यांना सुद्धा शिक्षक बँकेत सभासद होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे, तसा प्रस्ताव बँकेच्या आमसभेत मंजूर करण्यात आला.

# गजानन महाराजांची पालखी २१ ऑगस्टला अचलपुरात

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७अचलपूर,**



श्रीसंत गजानन महाराजांच्या भक्तांसाठी नागपूर ते श्रीक्षेत्र शेगाव पायी पालखी दिंडीचा २१ ऑगस्ट रोजी अचलपुरातील काळा मारुती संस्थान येथे मुक्काम होणार आहे. या पार्श्वभूमीवर भाविकांकडून पालखीच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात येत असून, अचलपूर नगरी भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. श्रीसंत गजानन महाराजांच्या भक्तांसाठी दरवर्षी नागपूर ते श्रीक्षेत्र शेगाव पायी पालखी दिंडीचे आयोजन करण्यात येते. श्रावण शुद्ध प्रतिपदा, १३ ऑगस्ट रोजी नागपूर येथून सुरू झालेली ही दिंडी २८ ऑगस्ट रोजी श्रावण शुद्ध पौर्णिमेला श्रीक्षेत्र शेगाव येथे पोहोचणार आहे. वाटचाली दरम्यान विविध ठिकाणी भाविकांना दर्शन देण्यासाठी पालखीचा मुक्काम केला जाणार आहे. अचलपुरातील मुक्कामादरम्यान भाविकांसाठी भजन, कीर्तन, प्रवचन तसेच हरिनामाचा गजर आयोजित करण्यात येणार आहे. महाराजांचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. काळा मारुती संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम लकडे, सामाजिक कार्यकर्ते राजू तायडे, विनय चतुर, गजानन कोळे, कुंदन यादव, अभय माथने, गजानन गोबाडे यांच्यासह भाविकांकडून दिंडीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी विशेष तयारी करण्यात येत आहे. वारकऱ्यांसाठी भोजन, पिण्याचे पाणी आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पालखीच्या आगमनाने अचलपूरच्या वातावरणात भक्तीचा जागर होणार आहे. पालखीचे स्वागत म्हणजे केवळ दिंडीचे स्वागत नसून, श्रीसंत गजानन महाराजांच्या चरणांचे स्वागत असल्याची भावना भाविकांमध्ये आहे. या पवित्र सोहळ्यात परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महामार्ग दुभाजकावरील वृक्षांचे विद्रूपीकरण

## वृक्षारोपणाचा देखावा; देखभालीअभावी रोपे वाळली, रानटी गवताने दुभाजक व्यापले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७पथ्रोट–** गावाच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी राष्ट्रीय महामार्गाच्या दुभाजकावर मोठ्या उत्साहात करण्यात आलेल्या वृक्षारोपणाचा देखावा महिनाभरातच विद्रूपीकरणात बदलला आहे. सुरवातीला ग्रामपंचायतने सुरक्षाजाळ्या आणि पाण्याची व्यवस्था केली; मात्र देखभालीअभावी अनेक रोपे मोकाट जनावरांच्या भक्ष्यस्थानी पडली असून दुभाजकावर रानटी गवत वाढले आहे. गावातील बसस्थानकापासून अंजनगाव व परतवाड्याच्या दिशेने दोन्ही बाजूंना सुमारे ५०० मीटर अंतरावरील राष्ट्रीय महामार्गाच्या दुभाजकावर विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली होती. गावाच्या सौंदर्यात भर पडावी, या उद्देशाने करण्यात आलेल्या वृक्षारोपणानंतर ग्रामपंचायतने प्रत्येक रोपाला सुरक्षाजाळी लावली होती. तसेच एक–दोन दिवसांच्या अंतराने



टँकरद्वारे पाणी देण्याची व्यवस्थाही करण्यात आली होती. मात्र, वाऱ्याच्या जोरामुळे अनेक ठिकाणी सुरक्षाजाळ्या पडल्या. त्यानंतर मोकाट जनावरांनी दुभाजकावरील काही रोपे खाऊन टाकली. परिणामी वृक्षारोपणाचा उद्देशच बाधित झाला आहे. राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाने दुभाजकाचे रंगकाम केल्यामुळे सुरवातीला परिसर आकर्षक दिसत होता. त्यातच गावातील काही स्वयंघोषित नेते व कार्यकर्त्यांनी वाढदिवसाचे औचित्य साधून वृक्षारोपण केले होते. रोपांची देखभाल करण्याची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली होती. मात्र, महिनाभरातच या जबाबदारीकडे दुर्लक्ष झाल्याने दुभाजकाची पुन्हा दुरवस्था झाली आहे. दुभाजकावर वाढलेले रानटी गवत या विद्रूपीकरणात आणखी भर घालत आहे. गवत नियंत्रणासाठी ग्रामपंचायतने फवारणी केली आहे.

# बोरगाव धर्माळे येथे विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप

## स्वातंत्र्य दिनानिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे यांचा शैक्षणिक उपक्रम; विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले आनंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून बोरगाव धर्माळे येथील पूर्व माध्यमिक मराठी शाळेत विद्यार्थ्यांसाठी शालेय बॅग वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे यांच्या तर्फे विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या शिक्षणाला हातभार लागावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर वातावरणात सहभाग घेतला. तिरंगा हा देशाच्या स्वाभिमानाचा, एकतेचा आणि अखंड भारताच्या गौरवाचा प्रतीक असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी देशप्रेमाची भावना मनात जपावी, तसेच देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने



आपापल्या क्षेत्रातून योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.शालेय बॅगचे वाटप झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन अशा प्रकारचे सामाजिक व शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबविणे गरजेचे असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.कार्यक्रमाला सरपंच/प्रशासक जोशीला राऊत, ग्रामपंचायत सदस्य अमोल तसरे, जयश्री मरोडकर, विजय दा. धर्माळे, ज्येष्ठ नागरिक शंकरराव पारोदे, ग्रामविकास अधिकारी मनीष इंगोले, संजय धर्माळे, माजी ग्रामपंचायत सदस्य रुशाली आशिष धर्माळे, शुभम भालेराव, योगेश तायडे, सेवा सहकारी सोसायटीचे संचालक दिलीप चव्हाण, माजी सरपंच मोहोड साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच शिक्षक प्रशांत मुडे, प्रजता मोहोड, विजय मोहोड, प्रशांत मोहोड, राजेश वानखडे, किशोर तायडे, लचू काळे, सचिन मरोडकर, रामेश्वर मोहोड यांच्यासह ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मेळघाटातील शंभर टक्के अनुदानित आश्रमशाळांना पावसाळ्यात गळती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ धारणी**

मेळघाटात केवळ शासकीयच नव्हे तर, शंभर टक्के अनुदानित आश्रमशाळांची परिस्थिती दयनीय आहे. छतावर असलेल्या टिनाला जागोजागी छीद्र पडल्यामुळे पावसाळ्यात गळती लागली आहे.

> **एकाच खोलीत दोन वर्ग**
>
> बहुतांश निवासी अनुदानित आश्रमशाळांमध्ये छोट्या–छोट्या वर्गखोल्या असतानाही येथे एकाचवेळी दोन वर्गांच्या विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्या जाते. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा कसा संवाद होत असेल, याबाबत विचार न केलेलाच बरा.

पंखेसुद्धा अशाठिकाणी अभावानेच आढळतात.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने चिखलदरा आणि धारणी, या दोन तालुक्यांतील आदिवासीबहूल भागामध्ये शासनाकडून शंभर टक्के अनुदानावर चालविण्यात येणाऱ्या



आश्रमशाळांची संख्या २७ च्या घरामध्ये आहे. त्यांचे संचलन विविध खासगी शैक्षणिक संस्थांकडून केल्या जाते. या आश्रमशाळांमध्ये ११ हजार २१४ विद्यार्थी इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेत आहेत. त्यापैकी काही आश्रमशाळा या निवासी स्वरूपाच्या आहेत. अनुदानित आश्रमशाळांपैकी बहुतांश आश्रमशाळांत वर्गखोल्यांवर सिमेंट काँक्रिटचे छत नसून टिनाचे छत आहे. त्यांच्या निवासाच्या खोल्यांचीही अवस्था गंभीर आहे. त्यातही काही ठिकाणी अनेक वर्षांपासूनचे छतावरील टीन बदलले नसल्यामुळे ते भंगार होऊन ठिकठिकाणी छीद्र पडून वर्गखोल्या व छताला पावसाळ्यात गळती लागल्याचे विदारक चित्र येथील एका प्रतिष्ठित संस्थेद्वारे हतरू गावात चालविल्या जाणाऱ्या शंभर टक्के अनुदानित शाळेत बघायला मिळाले. टिनांचे छत असलेल्या वर्गखोल्यांत पंख्येही दिसत नाहीत. त्यामुळे उन्हाळ्यात प्रचंड उष्णतामानात राहण्यापलीकडे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना पर्याय नाही.

> **‘खो–खो’च्या मैदानात गाजरगवत**
>
> एका अनुदानित आश्रमशाळेत सायंकाळच्या सुटीनंतर विद्यार्थी मैदानावर खेळताना दिसले. तेथे ‘खो–खो’चे खांब रोवले असले तरी मैदानावर गाजरगवतासह छोटी झुडुपे वाढलेली दिसली. खेळांच्या सुविधाही पुरविल्या गेल्या नाहीत.

**प्रकल्प कार्यालय धारणी**

अनुदानित आश्रमशाळांची संख्या : २७

मंजूर विद्यार्थी : १२ हजार ४८०

प्रवेशित विद्यार्थी : ११ हजार २१४

# ‘ॐ नमः शिवाय’, ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने शिवालये दुमदुमली

## पहिला श्रावण सोमवार आणि नागपंचमीचा योग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती :**

सण-उत्सवांचा महिना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रावणाला सुरुवात झाली असून, हिरवाईने नटलेली सृष्टी आणि महादेवाच्या भक्तीमय वातावरणामुळे अमरावती शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. श्रावणातील पहिला सोमवार आणि याच दिवशी आलेली नागपंचमी यामुळे शहरातील प्रमुख शिवालयांमध्ये भाविकांची मोठी मांदियाळी पाहायला मिळाली.पहाटेपासूनच मंदिर परिसरात ‘ नमः शिवाय’, ‘हर हर महादेव’ आणि ‘जय भोलेनाथ’च्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.अमरावती शहरातील गडगडेश्वर, तपोवनेश्वर, कोंडेश्वर, पाताळेश्वर, भुतेश्वर तसेच अंबागेट परिसरातील विविध शिवालयांमध्ये पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली. पहाटेच्या सुमारासच भाविक मंदिरांच्या दिशेने जाताना दिसत होते. महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांसह मोठ्या संख्येने शिवभक्तांनी रांगेत उभे राहून भगवान महादेवाचे दर्शन घेतले.श्रावण सोमवारच्या निमित्ताने भाविकांनी भगवान शंकराला बेलपत्र, फुले आणि जल अर्पण केले. अनेक भाविकांकडून शिवलिंगावर दुग्धाभिषेक तसेच जलाभिषेक करण्यात आला. नागपंचमी असल्याने नागदेवतेचे पूजन करून भाविकांनी सुख-समृद्धी आणि कुटुंबाच्या आरोग्यासाठी प्रार्थना केली. पहिला श्रावण सोमवार आणि नागपंचमीचा योग एकाच दिवशी आल्याने यंदाच्या पर्वाला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले.भाविकांची मोठी



गर्दी लक्षात घेता शहरातील मंदिर संस्थानांकडून विशेष नियोजन करण्यात आले होते. दर्शनासाठी स्वतंत्र रांगा, प्रवेश आणि निर्गमनाची व्यवस्था करण्यात आली होती. गर्दीच्या ठिकाणी भाविकांना कोणताही त्रास होऊ नये आणि दर्शनाची प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी स्वयंसेवक व मंदिर व्यवस्थापनाच्या कार्यकर्त्यांनी विशेष काळजी घेतली.शिवालयांमध्ये सकाळपासूनच सुरू असलेले मंत्रोच्चार, घंटानाद, भजन आणि ‘हर हर महादेव’चा जयघोष यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. अनेक भाविकांनी उपवास करून पहाटेच शिवदर्शन घेतले. श्रावणातील पुढील सोमवारांनाही मोठ्या संख्येने भाविक मंदिरांमध्ये येण्याची शक्यता असल्याने मंदिर संस्थानांकडून गर्दी व्यवस्थापन आणि भाविकांच्या सुविधांसाठी आवश्यक तयारी केली जात आहे.पहिला श्रावण सोमवार आणि नागपंचमीच्या दुहेरी पर्वामुळे अमरावतीतील शिवालयांमध्ये दिवसभर भक्तीचा उत्साह पाहायला मिळाला. श्रद्धा, भक्ती आणि धार्मिक वातावरणाने शहरातील वातावरण अक्षरशः ‘हर हर महादेव’मय झाले होते.

### आज नागपंचमी

पहिला श्रावण सोमवार आणि नागपंचमी एकाच दिवशी आल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साह आहे. घरोघरी नागपंचमी साजरी केली जाणार असून, पूजेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी रविवारी बाजारपेठेत मोठी गर्दी झाली होती.



# स्वातंत्र्यदिनी मद्यविक्रेता संघटनेचे महारक्तदान





## १ हजाराचे उद्दिष्ट ओलांडत १२९८ रक्तदात्यांचे रक्तदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती :**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत अमरावती जिल्हा मद्यविक्रेता संघटना आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात दोन ठिकाणी भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, तब्बल १ हजार २९८ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. धारणी येथे १११ तर अमरावती मध्ये ११८७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिबिरासाठी एक हजार रक्तपिशव्या संकलित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र, रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे निर्धारित उद्दिष्टाचा आकडा पार झाला.थॅलेसेमिया, सिकलसेल ॲनिमिया, हिमोफिलिया तसेच रक्ताचा कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना वारंवार रक्ताची आवश्यकता भासते. अशा रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि रक्ताचा तुटवडा भासू नये, या सामाजिक उद्देशाने या महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.अमरावती शहरातील शिबिर कॅम्प परिसरातील हॉटेल ग्रँड महफीलच्या रुबी हॉलमध्ये घेण्यात आले, तर धारणी येथील शिबिर उपजिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीच्या माध्यमातून पार पडले. दोन्ही शिबिरांची सुरुवात सकाळी ८ वाजता झाली आणि सायंकाळी ५ वाजेपर्यंत रक्तसंकलन करण्यात आले.मद्यविक्रेता संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगरसेवक नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. संघटनेचे पदाधिकारी, विविध आउटलेटमधील कर्मचारी तसेच सामाजिक क्षेत्रातील तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी होत रक्तदान केले.अमरावती येथील शिबिराचे व्यापक स्वरूप लक्षात घेता जिल्हा सामान्य रुग्णालय, पीडीएमएमसी, गोडे कॉलेज तसेच बडनेरा येथील संत गाडगेबाबा रक्तपेढीचे अधिकारी आणि कर्मचारी रक्तसंकलनासाठी उपस्थित होते. याशिवाय नागपूर येथील रेनबो रक्तपेढीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही रक्तसंकलनाच्या कार्यात सहभाग घेतला.या महारक्तदान शिबिराला राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्यासह जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधी, विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी आणि महापौर यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमातून रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित झाले.रक्तदान केल्यानंतर प्रत्येक रक्तदात्याला तत्काळ प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

त्यामुळे रक्तदात्यांमध्येही उत्साहाचे वातावरण होते. रक्तदानातून गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते, या भावनेतून अनेकांनी प्रथमच रक्तदान केल्याचेही यावेळी दिसून आले.यावेळी बोलताना संघटनेचे जिल्हाध्यक्ष नितीन देशमुख यांनी, रक्ताची गरज असलेल्या रुग्णांसाठी नियमितपणे रक्त उपलब्ध व्हावे, या उद्देशाने भविष्यातही सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला. संघटनेचे सचिव सचिन हिवसे, सागर भेटाळू, उपाध्यक्ष अनिल भामोरे, विजय जयस्वाल, सुरेश चांदवानी, दीपक गुडधे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.स्वातंत्र्यदिनाच्या उत्साहाला सामाजिक बांधिलकीची जोड देत आयोजित करण्यात आलेल्या या महारक्तदान शिबिरातून १ हजार २९८ रक्तपिशव्यांचे संकलन झाले. रक्तदात्यांच्या या योगदानामुळे गरजू रुग्णांना मोठा आधार मिळणार असून, सामाजिक क्षेत्रातूनही या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# १ सप्टेंबरपासून डोमा आश्रमशाळेतील विद्यार्थिनी नव्या वसतिगृहात

## ४८ क्षमतेच्या खोलीत तब्बल ११० विद्यार्थिनींचा मुक्काम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

मेळघाटातील डोमा येथील शासकीय निवासी मुलींच्या आश्रमशाळेतील विद्यार्थिनींच्या निवासाचा गंभीर प्रश्न अखेर प्रशासनाच्या निदर्शनास आला आहे. क्षमतेपेक्षा तब्बल दुप्पट विद्यार्थिनींना एका खोलीत कोंबून ठेवले जात असल्याचे समोर आले आहे. ४८ विद्यार्थिनींची क्षमता असलेल्या खोलीत तब्बल ११० विद्यार्थिनी मुक्काम करीत असल्याने एका बेडवर दोन ते तीन विद्यार्थिनी झोपण्याची वेळ आली होती.या गंभीर प्रकाराची आदिवासी विकास विभागाचे अमरावतीचे अप्पर आयुक्त संदीप गोलाईत यांनी दखल घेतली आहे. डोमा येथे नव्याने बांधण्यात आलेल्या वसतिगृहाचे काम पूर्ण झाले असून, १ सप्टेंबरपासून सर्व विद्यार्थिनींचे नव्या वसतिगृहात स्थलांतर करण्यात येणार असल्याची माहिती गोलाईत यांनी दिली. नव्या वसतिगृहात तब्बल २८८ बेडची व्यवस्था करण्यात आली असून, सर्व विद्यार्थिनींना पुरेशी जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे विद्यार्थिनींच्या राहण्याचा आणि



झोपण्याचा प्रश्न सुटण्याची अपेक्षा आहे.आदिवासी विद्यार्थिनींच्या आश्रमशाळांमध्ये मूलभूत सुविधांची कमतरता असताना शासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप विरोधकांनी केला. राज्य सरकारचे आश्रमशाळांकडे लक्ष नसेल तर आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधकांनी केली आहे.आदिवासी विभागासाठी उपलब्ध निधीचा योग्य वापर होत नसल्याची टीकाही त्यांनी केली. आदिवासींच्या विकासासाठी असलेला खर्च इतर योजनांकडे वळविला जात असल्याचा आरोप करत, विद्यार्थिनींच्या शिक्षण आणि निवासाच्या मूलभूत गरजांकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले.डोमा आश्रमशाळेतील परिस्थिती समोर आल्यानंतर ग्रामस्थांनीही प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसह आरोग्य, स्वच्छता आणि निवासाच्या सुविधा योग्य असणे आवश्यक असताना इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थिनींना एका खोलीत ठेवणे गंभीर बाब असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आता नव्या वसतिगृहात २८८ बेडची व्यवस्था उपलब्ध झाल्याने विद्यार्थिनींना दिलासा मिळणार असला, तरी आश्रमशाळेतील इतर मूलभूत सुविधांकडेही प्रशासनाने सातत्याने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

# अवैध व्यवसायांविरोधात नगरसेवक सह नागरिकांचा एल्गार; यशोदा नगर चौकात रास्ता रोको

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती :**

शहरातील फ्रेजरपूरा परिसरात कथितपणे सुरू असलेल्या अवैध दारू व गांजा विक्रीविरोधात नागरिक आक्रमक झाले आहेत. बहुजन समाज पक्षाचे नगरसेवक सचिन वैद्य यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी यशोदा नगर चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे परिसरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली.फ्रेजरपूरा परिसरातील विविध भागांत गावठी दारू, देशी दारू तसेच गांजाची कथितपणे सर्रास विक्री सुरू असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. अवैध व्यवसायांमुळे परिसरातील नागरिक, महिला आणि तरुणांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्याचेही आंदोलकांचे म्हणणे आहे. वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित



कारवाई होत नसल्याचा आरोप करत नागरिकांनी पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.या पार्श्वभूमीवर शेकडो नागरिक यशोदा नगर चौकात एकत्र आले आणि पोलीस प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत रास्ता रोको केला. अवैध दारू व गांजा विक्रीवर तातडीने आळा घालावा, संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि परिसरातील कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.आंदोलनाची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी मोठा बंदोबस्त तैनात केला. पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आंदोलकांशी चर्चा करून रस्ता मोकळा करण्याचा प्रयत्न केला. मात्र आंदोलक आपल्या मागण्यांवर ठाम राहिल्याने पोलिसांनी काही आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले. दरम्यान, या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अवैध व्यवसायांविरोधात प्रशासनाने ठोस कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# अर्धा किलो सोना चोरी प्रकरणात अल्पवयीन ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती :**

नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंद घरातून तब्बल ४९८ ग्रॅम सोने आणि दोन लाख रुपये रोख चोरीला गेल्याच्या प्रकरणाचा क्राईम ब्रांच-२ने छडा लावला आहे. या प्रकरणात एका अल्पवयीन संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पोलीस आयुक्त राकेश ओला स्वतः त्याची चौकशी करीत असल्याची माहिती आहे.काही दिवसांपूर्वी नागपुरी गेट परिसरातील एका बंद घराला अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य केले होते. घरमालक कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना ही चोरी झाली. घरमालक यापूर्वी दुबईत कार्यरत होते. सध्या ते एमआयडीसी परिसरातील एका प्लास्टिक कंपनीत व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत.घरातून मोठ्या प्रमाणात सोने आणि रोकड चोरीला गेल्याने पोलिसांनी तपासाला वेग दिला. क्राईम ब्रांच-२च्या पथकाने तपासाच्या आधारे एका अल्पवयीनाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे चोरीतील सोने, रोकड आणि या गुन्ह्यात सहभागी असलेल्या अन्य साथीदारांचा शोध घेतला जात आहे. टोळीतील आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास सुरू आहे.

# तळेगाव ठाकूर येथे शंभूसेना कावड यात्रेने दुमदुमला परिसर

### ..संत मारुती महाराज शिवभक्त मंडळाचा उपक्रम; ६१ कलशांतून पावण नदीचे जल आणून शिवपिंडीवर अभिषेक..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७तळेगाव ठाकूर**

श्रावण मासाच्या पावन पर्वावर तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे संत मारुती महाराज शिवभक्त मंडळाच्या वतीने शंभूसेना कावड यात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले. धार्मिक श्रद्धा, भक्ती आणि युवकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कावड यात्रेला विशेष स्वरूप प्राप्त झाले. ‘हर हर महादेव’, ‘बोल बम’ आणि ‘ नमः शिवाय’च्या जयघोषाने संपूर्ण





परिसर दुमदुमून गेला.संत मारुती महाराज मंदिरापासून कावड यात्रेला सुरुवात झाली. कावडधारी शिवभक्तांनी पारंपरिक पोशाखात गावातून भव्य मिरवणूक काढली. खांद्यावर कावड घेऊन युवकांनी केलेल्या जयघोषामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. डीजेवरील भक्तिगीते, ढोल-ताशांचा गजर आणि ‘हर हर महादेव’च्या घोषणांनी यात्रेची रंगत वाढली.गावातून मिरवणूक काढल्यानंतर कावडधारी शिवभक्त रात्री नागेश्वर मंदिर, धामंत्री येथे पोहोचले.

तेथे मुक्काम केल्यानंतर पहाटे ३ वाजता विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. त्यानंतर धामंत्री येथील पावण नदीतून ६१ कलशांमध्ये पवित्र जल भरण्यात आले. हे जल घेऊन शिवभक्तांनी तब्बल ३२ किलोमीटरची पायदळ कावड यात्रा सुरू केली.या यात्रेत सुमारे ७०० फूट लांबीची भव्य कावड खांद्यावर घेऊन शिवभक्तांचा ताफा तळेगाव ठाकूरकडे रवाना झाला. या आगळ्यावेगळ्या कावड यात्रेमुळे सहभागी शिवभक्तांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला होता. संपूर्ण मार्गावर ‘हर हर महादेव’ आणि ‘बोल बम’च्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले.दुसऱ्या दिवशी सकाळी कावड यात्रा तळेगाव ठाकूर येथे परतल्यानंतर गावकऱ्यांनी शिवभक्तांचे उत्स्फूर्त स्वागत केले. त्यानंतर कावडधारी शिवभक्त कावड घेऊन गावातील विविध मंदिरांत तसेच संत मारुती महाराज मंदिरात पोहोचले. मंदिरात विधिवत पूजा-अर्चा करून धामंत्री येथील पावण नदीतून आणलेल्या पवित्र जलाने शिवपिंडीवर अभिषेक करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.या कावड यात्रेत संत मारुती महाराज मंडळ, शंभूसेना मित्रमंडळाचे युवक तसेच अकोला येथील अनेक शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. युवकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यात्रेला विशेष रंगत आली. गावकऱ्यांनीही कावड यात्रेला मोठा प्रतिसाद देत ठिकठिकाणी शिवभक्तांचे स्वागत केले.यावेळी शंभूसेना शिवभक्त मंडळाचे अध्यक्ष ललित मारबदे, उपाध्यक्ष पूर्वेश मेहरे तसेच हर्षल आहाके, आदित्य मेहरे, पंकज मरस्कोल्हे, रोशन धुर्वे, जय टाकतोडे, रोहन मालगाये, कृणाल उके, अभिषेक पोटफोडे, हेमंत काळसर्पे यांच्यासह अकोला येथील शिवभक्त आणि तळेगाव ठाकूरमधील तरुण मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाली होती.श्रावण मासातील या कावड यात्रेच्या माध्यमातून युवकांनी धार्मिक परंपरा आणि शिवभक्तीची परंपरा जपण्याचा संदेश दिला. भक्ती, एकजूट आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडलेल्या या शंभूसेना कावड यात्रेची गावात सर्वत्र चर्चा होत आहे.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :